मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
www.rajdand.com
। पश्चिम महाराष्ट्र ।
follow us : /rajdandlive
RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २५ * अंक ३०५ सातारा * गुरूवार दि १ ऑगस्ट २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# पूजा खेडकर यांची उमेदवारी रद्द

## भविष्यात यूपीएससीच्या कोणत्याही परीक्षेस बसण्यास बंदी!



**मुंबई :** गेल्या महिन्याभरापासून चर्चेत असणाऱ्या पूजा खेडकर यांची उमेदवारी णझडउ नं अखेर रद्द केली आहे. आधी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयील गैरवर्तन व त्यानंतर कागदपत्रांमध्ये आढळलेली कथित अनियमितता या पार्श्वभूमीवर पूजा खेडकर यांची उमेदवारी यूपीएससीनं रद्द केल्याचं वृत्त एएनआयनं दिलं आहे. विशेष म्हणजे यापुढे यूपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेमध्ये पूजा खेडकर यांना बसता येणार नाही, असंही यूपीएससीकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. पूजा खेडकर यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. एकीकडे यूपाएससीनं त्यांच्यावर ही कारवाई केलेली असताना दुसरीकडे पूजा खेडकर यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर अद्याप पतियाला कोर्टानं निर्णय दिलेला नाही.

पूजा खेडकर यांच्या उमेदवारीबाबत णझडउ नं केलेल्या कारवाईबाबत एएनआयनं सोशल मीडियावरील पोस्टमध्ये माहिती दिली आहे. 'यूपीएससी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाने पूजा मनोरमा दिलीप खेडकर यांना देण्यात आलेली प्रोव्हिजनल उमेदवारी रद्द करण्यात आली आहे. तसेच, यापुढील काळात यूपीएससीकडून घेण्यात येणारी कोणतीही परीक्षा त्यांना कधीच देता येणार नाही, असं यूपीएससीकडून सांगण्यात आलं आहे', अशी माहिती एएनआयच्या पोस्टमध्ये देण्यात आली आहे.

नेमकं प्रकरण काय?

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात गैरवर्तन केल्याचा ठपका पूजा खेडकर यांच्यावर आधी ठेवण्यात आला. त्यानंतर हे प्रकरण चर्चेत आलं. पुढे पूजा खेडकर यांनी सनदी सेवेत निवड होताना त्यांच्या दिव्यंगत्वाबाबत चुकीची कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप करण्यात आला. शिवाय, त्यांच्या वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही त्यांनी ओबीसी क्रिमी लेअर सुविधेचा लाभ घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, यासाठी त्यांनी परीक्षेसाठी अर्ज करताना नावामध्येही वारंवार बदल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांनी याचबाबत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून त्याचा उल्लेख न्यायालयातील सुनावणीमध्ये करण्यात आला.

पूजा खेडकर यांनी सनदी सेवेत निवड होताना चुकीची कागदपत्रं सादर केली होती, असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्यात त्यांच्या वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही त्यांनी क्रीमिलेअर प्रमाणपत्राचा फायदा घेऊन आयएएस पद पदरात पाडून घेतल्याचाही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याशिवाय, त्यांनी सादर केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रामध्येही अनियमितता असल्याचा दावा न्यायालयातील सुनावणीदरम्यान करण्यात आला आहे.पूजा खेडकर यांच्या पालकांचा घटस्फोट झालाय की नाही? याचीही चौकशी पोलिसांकडून केली जात असल्याचं इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तात नमूद करण्यात आलं आहे. पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर वंचित बहुजन आघाडीच्या तिकिटावर निवडणूक लढले होते. त्यावेळी त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांची मालमत्ता ४० कोटींहून अधिक असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर पूजा खेडकर यांना क्रीमीलेअर प्रमाणपत्र कसं मिळालं? असा प्रश्न उपस्थित केला जात असतानाच पालकांचा घटस्फोट झाला असून आपण आईकडे राहतो, त्यामुळे आपलं उत्पन्न कमी आहे, असा पूजा खेडकर यांचा दावा समोर आला. त्यामुळे त्यांच्या घटस्फोटावरही आता प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे.

# तुमच्या नाकावर टिच्चून महाराष्ट्रात सत्ता आणून दाखवतो

## उद्धव ठाकरेंचे ओपन चॅलेंज



**मुंबई :** एक वेळ अशी होती की छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे स्वप्न उदध्वस्त झाले होते, सर्व गडकिल्ले तहात गेले. तरीही महाराजांनी शौर्य दाखवल आणि स्वराज्य उभ करून दाखवलं. त्याच महाराजांची स्फूर्ती घेऊन उभा राहिलो आहे. तुम्ही माझे सगळे घेतले तरी तुमच्या नाकावर टिच्चून सत्ता आणून दाखवतो की नाही बघाच, अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी खुले आव्हान दिले आहे. मुंबईत रंगशारदा सभागृहात आयोजित पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवरही निशाणा साधला आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, ही लढाई आहे आणि रणांगण आहे, मर्द असाल तर रणांगणात उतरा नाहीतर काठावर बसून लढाई बघा. मला खात्री आहे. तुम्ही शिवसैनिक आहात, शिवसैनिकाची ओळख सोडू नका, हा माझ्या शिवसैनिकावर उठलेला हात आहे. येत्या निवड़णुकीत हा हात उठता कामा नये. आपलं हिंदुत्त्व वेगळ आहे. यांचे हिंदुत्त्व तोडो, फोडा आणि राज्य करा असे आहे. हे आग लावण्याचे धंदे करतील. आजही अनेकांना फोन येत असतील ज्यांना जायचंय त्यांन उघड जा, पण आत राहून दगाबाजी करू नका.

उद्धव ठाकरे म्हणाले, 'मुंबईत जमीन शिल्लक नाही. जी शिल्लक आहे त्यावर बिल्डिंग बांधालं पण त्याला पाणी कुठून देणार वीज कुठून देणार, रस्त्याची योजना कशी देणार, पण ते मला माहिती नाही माझा अदानी आणि माझा लाडला. हे सर्व बिल्डर्स आहे. वारेमाप हात सुटलेत पूर्वी भूखंडाचे श्रीखंड होते. पण आता गटाराचेही श्रीखंड झालंय. कारण गटारावरही बिल्डिंग्स झाल्या तर ही लढाई शिवसेनेच्या अस्तित्त्वाची नाही तर मुंबईच्या अस्तित्त्वाची आहे. मुंबईच्या मराठी माणसाच्या अस्तित्त्वाची आहे.

आपण मोदींनाही घाम फोडलाय माझी इच्छा आहे. मोदींनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारसभेला आलेच पाहिजे. लोकसभेत घाटकोपरला पंतप्रधानांचा रोडशो झाला.

कल्याणमध्ये आपण एक मध्यमवर्गीय महिलेला उमेदवारी दिली होती. तिच्या विरूद्ध कोण गद्दार आणि गद्दाराचं कार्ट. त्यांच्याकडे पैसा अमाप, पण आपण उमेदवारी दिलेल्या एका मध्यमवर्गीय महिलेला पाडण्यासाठी यांना पंतप्रधानांना बोलवावं लागलं हा आपला विजय आहे. काय ही तुमची केविलवाणी अवस्था. असा टोलाही उद्धव ठाकरेनी लगावला आहे.



# आजपासून राज्यात पुन्हा सक्रिय होणार पाऊस

## मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता

**मुंबई :** मुंबईसह परिसराला झोडपून काढलेल्या पावसाने विश्रांती घेतली असली तरी ऑगस्टच्या प्रारंभी तो पुन्हा एकदा जोर पकडणार आहे. आज १ ऑगस्टला रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांना ऑरेंज तर मुंबई आणि ठाणे जिल्ह्याला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

१ ते ४ ऑगस्ट या चार दिवसांत महाराष्ट्रात पुन्हा मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. शनिवार-रविवारी पावसाचा जोर अधिक असू शकतो.

आतापर्यंत ओढ दिलेल्या प्रदेशातही समाधानकारक पावसाची अपेक्षा आहे, अशी माहिती हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली. ५ ऑगस्टपासून कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात पावसाचा जोर काहीसा कमी होऊ शकतो.

२ ऑगस्ट : ऑरेंज - रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर

३ ऑगस्ट : ऑरेंज - नाशिक, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा

४ ऑगस्ट : ऑरेंज - रायगड

# दिग्गज क्रिकेटपटू आणि माजी प्रशिक्षक अंशुमन गायकवाड यांचे निधन, कॅन्सरशी झुंज अपयशी

**नवी दिल्ली :** भारताचे माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटर अंशुमन गायकवाड यांचं कर्करोगानं काल निधन झालं. त्यांनी वयाच्या ७१ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. अंशुमन गायकवाड यांनी रक्ताच्या कर्करोगाशी दीर्घ काळ संघर्ष केला. लंडनमधल्या किंग्स कॉलेज रुग्णालयात त्यांच्यावर नुकतेच उपचार करण्यात आले होते. गेल्याच महिन्यात ते लंडनमधून भारतात परतले. पण गायकवाड यांची कर्करोगाशी सुरू असलेली झुंज अखेर अयशस्वी ठरली. गायकवाड यांनी आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत ४० कसोटी आणि १५ वनडे सामन्यांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केलं. त्यांनी बीसीसीआयचे निवड समिती सदस्य आणि भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणूनही जबाबदारी सांभाळली. गायकवाड प्रशिक्षकपदी असताना भारतीय संघ २००० साली आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीत उपविजेता ठरला होता.

माजी भारतीय क्रिकेटपटू आणि टीम इंडियाचे प्रशिक्षक अंशुमन गायकवाड यांचं निधन झालं आहे. ते दीर्घकाळापासून ब्लड कॅन्सरशी झुंज देत होते. अंशुमन यांची अवस्था पाहून कपिल देव (घरळिश्र ऊर्शी) यांनी मदतीसाठी पुढाकार घेतला. अंशुमनला मदत करण्यासाठी कपिल देव यांनी आपली पेन्शन दान करण्याचा निर्णयही घेतला होता. मोहिंदर अमरनाथ, संदीप पाटील, मदन लाल आणि कीर्ती आझाद यांनीही अंशुमन गायकवाड यांना मदतीचा हात पुढे केला होता. भारतीय क्रिकेट नियामक मंडळानंही अंशुमन यांच्या उपचारासाठी एक कोटी रुपयांची मदत जाहीर केली होती.




अंशुमन गायकवाड यांनी २७ डिसेंबर १९७४ रोजी वेस्ट इंडिजविरुद्ध कोलकाता येथे कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. १९८४ च्या शेवटच्या दिवशी इंग्लंडविरुद्ध सुरू झालेल्या कोलकाता कसोटीत त्याचा शेवटचा कसोटी सामना होता.

अंशुमन गायकवाडनं ४० कसोटी सामन्यांच्या कारकिर्दीत ३०.०७ च्या सरासरीनं १९८५ धावा केल्या, ज्यात २ शतकं आणि १० अर्धशतकांचा समावेश आहे. त्यांची सर्वोत्तम धावसंख्या २०१ धावा होती, जी त्यांनी पाकिस्तानविरुद्ध केली होती. गायकवाड यांनी भारतासाठी १५ एकदिवसीय सामन्यांमध्येही भाग घेतला, ज्यात त्याच्या नावावर २०.६९ च्या सरासरीनं २६९ धावांचा रेकॉर्ड आहे.

फर्स्ट क्लास क्रिकेटमध्येही दमदार कामगिरी

७१ वर्षीय अंशुमन यांनी २०६ फर्स्ट क्लास सामन्यांमध्ये ४१.५६ च्या सरासरीनं १२ हजार १३६ धावा केल्या होत्या. या कालावधीत त्यांच्या बॅटमधून ३४ शतकं आणि ४७ अर्धशतकं खेळवण्यात आली होती. फर्स्ट क्लास क्रिकेटमधली त्यांची सर्वोत्तम धावसंख्या २२५ धावा होती. याशिवाय, गायकवाड यांनी ५५ लिस्ट-ए सामने देखील खेळले, ज्यात त्यांनी ३२.६७ च्या सरासरीनं एकूण १६०१ धावा केल्या.

क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर अंशुमन यांनी कोचिंगला आपलं करिअर म्हणून स्वीकारलं. १९९७-९९ दरम्यान ते भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक होते. गायकवाड यांनी गुजरात स्टेट फर्टिलायझर्स अँड केमिकल्स लिमिटेड मध्येही काम केलं आणि २००० मध्ये या कंपनीतून गायकवाड निवृत्त झाले.

जून २०१८ मध्ये, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं गायकवाड यांना जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित केलं. अंशुमन गायकवाड यांचे वडील दत्ता गायकवाड यांनीही कसोटी क्रिकेटमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केलं होते.

# जागा वाटपाबाबत ७ ऑगस्टला मविआची बैठक

## बाळासाहेब थोरातांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट

**मुंबई :** महाविकास आघाडीतीलतीन प्रमुख पक्षांची जागा वाटपासंदर्भात येत्या ७ ऑगस्ट रोजी पहिली बैठक होत आहे. त्या अनुषंगानेकाँग्रेसचेनेते बाळासाहेब थोरात यांनी बुधवारी 'मातोश्री'वर जाऊन उद्धवसेनेचे पक्षप्रमुखउद्धव ठाकरेयांची भेट घेतली. जागा वाटपाच्या बैठकीबाबत आमचीउद्धव ठाकरेंशीचर्चा झाल्याचे थोरात यांनी या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.

मी उद्धव ठाकरे यांना भेटलो तेव्हा तिथूनच आम्ही शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणिकाँग्रेसचेप्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याशी याबाबत फोनवरून चर्चा केल्याचे थोरात यांनी सांगितले.महाविकास आघाडीमध्येजे समन्वयक आहेत त्यांचीही बैठक मुंबईत असेल, असेही थोरात यांनी सांगितले.



# सरसकट आले खरेदीसाठी खुद्द पणनमंत्रीही आक्रमक

## व्यापाऱ्यांवर कारवाईचा इशारा; शेतकरी संघर्षाच्या तयारीत

**सातारा :** जुने- नवे अशी प्रतवारी न करता सरसकट आले खरेदीवर सर्वांचे एकमत असताना, काही संधिसाधू व्यापारी व दलाल प्रतवारीनुसार आले खरेदीचा घाट घालत आहेत. त्यांच्याकडून अडवणूक करून व आमिष दाखवून आले खरेदी सुरू असल्याने त्याविरोधात संघर्षाचे रान उठत आहे. यावर आता राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार हे आक्रमक झाले असून, प्रतवारीने आले खरेदी केल्यास सक्त कारवाईचा इशारा त्यांनी दिला आहे.

सातारा जिल्ह्यात विशेषतः सातारा, कोरेगाव तालुक्यात आले पीक मोठ्या प्रमाणात घेतले जात असे. त्यात सातारा बाजार समिती हे आले खरेदीचे केंद्र बनले आहे. बाजारपेठेत दरवर्षी आले मागणी तेजीत राहिल्याने चढे दर आणि उत्पादनात नुकसानीचा धोका कमी असल्याने अन्यत्रही आले पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल राहिला आहे.

आले उत्पादक शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळतोय म्हटल्यावर जुने- नवे अशा प्रतवारीनुसार आले खरेदीचे धोरण पुढे आणून व्यापारी व दलालांनी शेतकऱ्यांची लूट चालवल्याच्या तक्रारी पुढे आल्या. आणि आले उत्पादक शेतकऱ्यांमध्ये या प्रश्नावरून गेल्या दोन - चार वर्षांपासून संघर्ष सुरू आहे.

आले खरेदीच्या धोरणावर गरमागरम चर्चा होऊन सातारा, कोरेगावसह अनेक शेती उत्पन्न बाजार समित्यांनी शेतकऱ्यांची मागणी न्याय असल्याचे मान्य करीत सरसकट आले खरेदी करावी असे ठराव केले. व्यापारी, अडते व शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन हा सर्वमान्य तोडगा निघाल्याचे जाहीर केले आहे. राज्य शासनाने तसा निर्णय घेतला आहे. मात्र, काही खरेदीदार व्यापारी व दलालांनी शेतकऱ्यांची कोंडी करून, प्रतवारीनुसार आले खरेदीचा घाट घातला आहे. त्यात अडवणूक करून आणि आमिष दाखवून त्यांची आले खरेदी सुरू असल्याने त्याविरोधात तीव्र संघर्षाची ठिणगी पडली आहे.

कोरेगावच्या शेतकऱ्यांनी सहकार उपनिबंधकांना शेकडो निवेदने देऊन सक्त आंदोलनाचा इशारा दिला आहे. शेतकऱ्यांच्या या आंदोलनासाठी बाजार समितीचे सभापती ड. पांडुरंग भोसले, किशोर गायकवाड, सुरेश जगदाळे, ड. सतीश कदम, किरण साळुंखे यांनी पुढाकार घेतला आहे. त्याला अन्य ठिकाणच्या आले उत्पादकांचा उत्स्फूर्त पाठिंबाही मिळत आहे.

ही सर्व परिस्थिती गांभीर्याने घेऊन आता राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी या प्रश्नी वैयक्तिक लक्ष घातले आहे. नुकतीच सिल्लोड येथे बैठक घेऊन प्रतवारी न करता आले खरेदी करा, अन्यथा कारवाई अटळ असल्याचा इशारा व्यापारी व दलालांना दिला आहे. त्यातून आले उत्पादकांना दिलासा मिळाला असला तरी त्याची अंमलबजावणी नेमकी कशी होणार? हा कळीचा मुद्दा आहे. त्यासाठी बाजार समित्यांनी कृती आराखडा बनवून जबाबदारी घेण्याची गरज आहे.

# धरणांच्या परिसरात रात्रभर संततधार

## खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवला



**पुणे :** खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण वाढले आहे. गेल्या बारा तासांमध्ये धरणांमध्ये पुणे शहराला १५ दिवस पुरेल एवढा पाणीसाठा जमा झाला आहे. त्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रात बुधवारी सकाळी सात वाजल्यापासून ११ हजार ४०७ क्युसेक वेगाने पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली. त्यामुळे पुन्हा मुठा नदीकाठच्या नागरिकांना जलसंपदा विभागाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला या चारही धरणात मिळून बुधवारी सकाळी सहा वाजेपर्यंत ८८ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. मंगळवारी रात्रीपासून बुधवारी सकाळपर्यंत टेमघर धरणाच्या परिसरात ९५ मिलिमीटर, वरसगाव धरणक्षेत्रात ६६ मि.मी., पानशेत धरण परिसरात ६९ मि.मी. आणि खडकवासला धरणक्षेत्रात ११ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. सध्या धरणांमध्ये २५.७८ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच ८८.४४ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. वरसगाव धरणातून वीजनिर्मितीसाठी ६०० क्युसेक, पानशेत धरणातून वीजनिर्मितीसाठी ६०० क्युसेक, तर खडकवासला धरणात १९४२ क्युसेकने आणि खडकवासला धरणातून मुठा नदीत ११ हजार ४०७ क्युसेकने पाणी सोडण्यात येत आहे. धरणांच्या परिसरात असाच पाऊस कायम राहिल्यास पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात येणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

# विधानसभा निवडणुकीसाठी सातारा जिल्हा काँग्रेस सज्ज

## जिल्हाध्यक्ष सुरेश जाधव यांची आढावा बैठकीत माहिती

**सातारा :** सातारा व जावली तालुक्यातील काँग्रेस पक्ष संघटना मजबूत करण्याचे काम पदाधिकारी व कार्यकर्ते सामूहिक करत असून बलाढ्य विरोधक असूनसुद्धा काँग्रेस जोमाने कामाला लागली आहे. आता लढायचे आहे असे समजून कार्यकर्ते कामाला लागले आहेत त्याचा प्रत्यय लोकसभा निवडणुकीत दिसला असून विरोधकांचे मताधिक्य कमी करण्यात यश मिळाले आहे असे प्रतिपादन सातारा काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुरेश जाधव यांनी केले.




काँग्रेस कमिटीमध्ये झालेल्या आढावा बैठीकितते बोलत होते. यावेळी महिला अध्यक्षा सौ अल्पना यादव, जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई, बाबासाहेब कदम यांची प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी जावली अध्यक्ष संदीप माने, प्रदेश सचिव धनश्री महाडिक,शहर अध्यक्ष महिला काँग्रेस रजिया शेख, ओबीसी अध्यक्ष जगन्नाथ कुंभार, सुषमाराजे घोरपडे, प्रची तकतोडे, अन्वर पाशा खान, कल्याण पिसाळ, विक्रम तरडे, आदी मान्यवर उपस्थत होते.

यावेळी बोलताना जाधव यांनी सांगितले की सातारा विधानसभा मतदारसंघा विरोधी पक्ष बलाढ्य आहे. त्यांच्या समोर काम करताना अडचणी येतात परंतु आपला निषाठवान कार्यकर्ता कोणत्याही दबावाला न जुमानता काम करीत आहे त्याला वरिष्ठ नेत्यांकडून ताकद मिळण्याची गरज आहे. लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने झोकून काम केले त्याचा फायदा विरोधी उमेदवाराची मते कमी करण्यात झाला. असेच सर्वांनी काम केले तर आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस ला नक्की फायदा होईल. म्हणून महाविकस आघाडीकडे जागेची मागणी करावी त्याचा नक्की पक्षाला फायदा होईल. सातारा तालुक्यात काँग्रेस पक्ष संघटना मजबूत होत असून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षाचे नेते राहुलजी गांधी पक्षाध्यक्ष खरगे व आपले नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज बाबा चव्हाण यांचे विचार आणि पक्षाची ध्येय धोरणे जनतेसमोर मांडावीत, भविष्यात काँग्रेसच देशाला आणि राज्याला विचार देणार आहे त्यामुळं कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त कार्यकर्ते पक्षा सोबत जोडावेत.

यावेळी जावली अध्यक्ष संदीप माने यांनी तालुक्याचा आढावा मांडला. आभार रजिया शेख यांनी केले.

# जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे जुनी पेन्शनसाठी छत्री धरणे आंदोलन

सातारा : सन २००५ नंतरच्या सर्व शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या अन्यायकारक छझड योजना बंद करून जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना जिल्हा सातारा यांच्या वतीने १ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे छत्री धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनात सातारा जिल्ह्यातील सर्व शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटना, शिक्षक संघटना सामील होणार आहेत तसेच महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय समिती सामील होणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात जुन्या पेन्शनसाठी होणाऱ्या या आंदोलनाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष असणार आहे.

## उपचारा दरम्यान एकाचा मृत्यू

**सातारा :** दगडू निवृत्ती बोरगे (वय ३८, सध्या रा. मंगळवार पेठ, सातारा मूळ रा. विरेवाडी ता. पाटण) यांना पोटदुखीचा त्रास झाल्याने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरु असताना त्यांचा मृत्यू झाला. याची नोंद शाहूपुरी पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे.

## आरळे, अंगापूर येथे जुगारावर कारवाई

**सातारा :** आरळे व अंगापूर ता. सातारा येथे पोलिसांनी दोन ठिकाणी जुगार प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल केला. आरळे येथे तानाजी रामचंद्र पवार (वय ४६, रा. आरळे) याच्याकडून पोलिसांनी ११६० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. दुसरी कारवाई अंगापूर येथे शापीर महमद मुल्ला (वय ४२, रा. तासगाव ता.सातारा) याच्यावर करण्यात आली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून रोख ८१० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

## बेकायदा दारु विक्री प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** आकाशवाणी झोपडपट्टी येथे बेकायदा दारु विक्री करणाऱ्या समीर आबाजी कांबळे (वय ४१) याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्याच्याकडून ६३० रुपये किंमतीच्या ९ दारुच्या बाटल्या जप्त केल्या आहेत. याप्रकरणी शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घातल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** सातारा शहर परिसरात सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घातल्याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सातारा बसस्थानक येथे सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घातल्या प्रकरणी राजेश अशोक देसाई (वय ४६, रा. सज्जनगड ता.सातारा) याच्या विरुध्द शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २९ जुलै रोजी ही कारवाई करण्यात आली आहे. दुसरा गुन्हा संतोष अर्जुन पवार (वय ३८, रा. सदरबझार) याच्यावर दाखल करण्यात आला आहे. त्याने दि. २९ जुलै रोजी सातारा बसस्थानक परिसरातच सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घातला होता.

## मुलाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती, सासूवर गुन्हा

**सातारा :** मुलाला आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी शाहूपुरी पोलिस ठाण्यात पत्नी व सासूवर गुन्हा दाखल झाला आहे. सौ. धनश्री महेश जाधव व सुनिता राजेंद्र जाधव (दोघी रा. नारायण पेठ, पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

सिंधू सुनील जाधव (वय ५६, रा. बुधवार पेठ, सातारा) यांनी शाहूपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. दरम्यान, महेश सुनील जाधव (वय ३२) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. महेश हा तक्रारदार सिंधू जाधव मुलगा आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, २९ जुलै रोजी हा गुन्हा दाखल झाला आहे. महेश जाधव यांनी राहते घरी लोखंडी अँगलला गळफास घेवून आत्महत्या केली. महेश जाधव यांना त्यांची पत्नी धनश्री व सुनीता पवार या त्रास देत होत्या. वारंवार पैशांची मागणी करत होते. तसेच खोटी तक्रार दिली होती. याद्वारे दोघी महेश यांना मानसिक त्रास देत होत्या. या सर्व त्रासाला कंटाळून महेश यांनी आत्महत्या केली, असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## केदारनाथमध्ये ढगफुटी, पदयात्रेच्या मार्गावर भूस्खलन

**मुंबई :** मुसळधार पावसामुळे केरळमधील अनेक भागांमध्ये पूर आलेला असतानाच आता उत्तर भारतातही तशीच स्थिती निर्माण झाली आहे. अतिवृष्टीमुळे दिल्लीच्या अनेक भागांमध्ये पाणी साचलं आहे. पाठोपाठ उत्तराखंडमध्येही अतिवृष्टी सुरू झाली आहे. केदारनाथला जाणाऱ्या मार्गावर लिनचोलीजवळ ढगफुटीची घटना समोर आली आहे. त्यामुळे काहीच क्षणात मंदाकिनी नदीची जलपातळी वाढली आहे. ढग फुटल्याने ओढे, नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. अनेक भागांमध्ये पाणी साचलं असलं तरी अद्याप कोणत्याही जीवितहानीचं वृत्त समोर आलेलं नाही. मात्र, केदारनाथला जाणारी पदयात्रा विस्कळीत झाली आहे. पदयात्रेच्या मार्गावरच ढग फुटल्याने ५० ते २०० तीर्थयात्रेकरू अडकल्याचं वृत्त नुकतंच समोर आलं आहे.

या पदयात्रेतील मार्ग असलेल्या परिसरात भूस्खलन होऊन रस्त्याचा ३० मीटरचा भाग दुर्घटनाग्रस्त झाला आहे. केदारनाथला जाणारा पायी मार्ग दुर्घटनाग्रस्त झाल्याने या मार्गावरील दळणवळण पूर्णपणे ठप्प झालं आहे.

# तासगावातील बेदाणा उधळण थांबवा अन्यथा आंदोलन

**तासगाव :** तासगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत बेदाणा सौद्यात कोट्यवधी रुपयांच्या बेदाण्याची उधळण केली जाते. दांगट समितीने दिलेल्या अहवालाची अंमलबजावणी करावी. तात्काळ बेदाणा उधळण थांबवावी. अन्यथा आंदोलन करण्यात येईल. असा इशारा तासगाव तालुका तिसरा तिसऱ्या आघाडीच्यावतीने देण्यात आला. याबाबत जिल्हा उपनिबंधकांना निवेदन दिले आहे. तासगाव बाजार समितीचे संचालक आणि काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महादेव पाटील यांनी पत्रकार बैठकीत ही माहिती दिली.

शेतकऱ्यांचा कळवळा निवडणुकीपुरताच घेणाऱ्या बाजार समितीच्या सत्ताधाऱ्यांना निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांचा विसर पडल्यामुळेच शेतकऱ्यांची लूट सुरू असल्याचा आरोप करत सत्ताधाऱ्यावर निशाणा साधला.

तासगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांचा बेदाणा उधळण करून वर्षाला १५ ते २० कोटी रुपयांची लूट होत आहे. खुलेआमपणे होणाऱ्या या लुटी बाबत बाजार समितीच्या सत्ताधाऱ्यांकडून सोयीस्कर दुर्लक्ष केले जात आहे. दांगट समितीने शासनाला सादर केलेल्या अहवालात देखील बेदाणा उधळण थांबवण्याबाबत शिफारस केली आहे. मात्र या अहवालाची बाजार समितीकडून



अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची लूट राजरोसपणे सुरू आहे.

तासगाव तालुका तिसऱ्या आघाडीच्यावतीने जिल्हा उपनिबंधकांना या लुटीबाबत निवेदन देण्यात आले आहे. बेदाणा सौद्यात सॅम्पल काढतेवेळी पाच किलो पर्यंत बेदाणा उधळला जातो. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. विक्री न झालेल्या बेदाण्याचीही तूट धरली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होत आहे. शेतीमाल विकताना शेतकऱ्यावर आर्थिक बोजा टाकणे हे न्यायसुसंगत नाही, असे निवेदनात म्हटले आहे.

राज्य शासनाने शेतीमाल विक्री व्यवस्थेबाबत दांगट समिती नेमली होती. या समितीने शासनास सादर केलेल्या अहवालात बेदाणा हवेत उधळून नुकसान करणे, उधळलेला बेदाणा शेतकऱ्याला परत न करणे, याबाबतच्या बाजार समितीत चाललेल्या गैरकारभाराविषयी शिफारस केली होती. मात्र या समितीच्या शिफारशीबाबत अंमलबजावणी झाली नाही.

त्यामुळे तासगाव, सांगली आणि पंढरपूर बाजार समितीतील बेदाण्याची उधळण तात्काळ थांबवण्यात यावी आणि शेतकऱ्यांची लूट बंद करावी. यासाठी जिल्हा उपनिबंधकांना निवेदन दिले आहे. याबाबत सकारात्मक निर्णय झाला नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी महादेव पाटील यांनी पत्रकार बैठकीत दिला.

**❋तासगाव बाजार समितीचे सत्ताधारी बोलघेवडे : पाटील❋**

बाजार समितीत चाललेल्या गैरव्यवहाराला बाजार समितीचे सत्ताधारी पदाधिकारी आणि नेते जबाबदार असल्याचा आरोप बाजार समितीचे संचालक महादेव पाटील यांनी यावेळी केला. निवडणुकीच्या वेळी शेतकरी हिताच्या घोषणा केल्या. विस्तारित मार्केट सहा महिन्यात सुरू करण्याच्या वल्गना केल्या. प्रत्यक्षात मात्र विस्तारित मार्केटचे कोणतेच काम झाले नाही. शेतकऱ्यांची लूट थांबवली नाही. याउलट मर्जीतील व्यापाऱ्यांना सौद्याच्या वेळी वेळा वाढवून देऊन आर्थिक हितसंबंध साधण्याचा उद्योग सत्ताधारी कारभारी आणि नेत्यांच्याकडून होत आहे. तासगाव बाजार समितीचे सत्ताधारी केवळ बोलघेवडे आहेत, असा आरोप पाटील यांनी यावेळी केला.

# मराठा आरक्षण आंदोलकांची 'मातोश्री'बाहेर घोषणाबाजी

## आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करण्याची ठाकरे यांच्याकडे मागणी

**मुंबई :** मराठा आरक्षणाबाबत शिवसेना उद्धव ठाकरे गटाने आपली भूमिका स्पष्ट करावी, या मागणीसाठी मराठा आरक्षण आंदोलकांनी मातोश्री या उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानाबाहेर जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी ठाकरे यांची भेट होईपर्यंत आंदोलकानी मातोश्रीबाहेर ठिय्या मांडून बसण्याचा इशारा दिला आहे.

मराठा आरक्षणाबाबत विरोधी पक्षांनी देखील आपापल्या भूमिका स्पष्ट कराव्या, अशी मागणी आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. त्यानुसार आपण विरोधी पक्षांकडे प्रथम त्यांची भूमिका काय, याबाबत विचारणा करणार असल्याचे मराठा आंदोलकांनी स्पष्ट केले आहे. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या छत्रपती संभाजी नगर दौऱ्याच्या वेळी तिथेही आंदोलकांनी निदर्शने केली होती.

मराठा आरक्षणाबाबत शिवसेनेची भूमिका स्पष्ट करावी, या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाने काल उद्धव ठाकरे यांची मातोश्री निवासस्थानी जाऊन भेट घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, उद्धव ठाकरे शिष्टमंडळाला न भेटता मातोश्रीबाहेर पडले. त्यामुळे आज मातोश्रीवर मराठा क्रांती ठोक मोर्चा आयोजित करण्यात आला. दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास मातोश्री बाहेर जमलेल्या आंदोलकांनी, उद्धव ठाकरे जबाब दो, अशी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. या आंदोलनामुळे कायदा सुव्यवस्था धोक्यात येऊ नये यासाठी पोलिसांनी मातोश्रीच्या परिसरात बंदोबस्तात वाढ केली आहे.

# यशश्रीच्या मारेकऱ्याला फाशीची शिक्षा द्या




मुंबई: नवी मुंबई जवळील उरण येथे राहणाऱ्या यशश्री शिंदे हिची दाऊद शेख या तरुणाने अत्यंत क्रूरपणे हत्या केली. या क्रूर दाऊद शेखला लवकरात लवकर फाशीची शिक्षा देवून मृत यशश्रीला न्याय मिळावा अशी मागणी मंगळवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत विश्व हिंदू परिषदेच्या मातृशक्ती प्रांत सहसंयोजिका मनीषा भोईर यांनी यावेळी केली. अनेक वर्षे सुरू असलेल्या भारतातील लव्ह जिहाद सारख्या षडयंत्राच्या माध्यमातून अनेक तरुणींच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. भारत देशात लव्ह जिहादच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. १८ वर्षाखालील व १८ वर्षा वरील मुलींना लक्ष्य करून त्यांना पळवून मुस्लिम करण्याचे षडयंत्र दिवसेंदिवस समोर येत आहे. दाऊद शेख यानेही अशाच विकृत मानसिकतेतून अत्यंत क्रूरपणे यशश्री शिंदे हिचा बळी घेतला आहे. असे विश्व हिंदू परिषदेच्या मातृशक्ती प्रांत सहसंयोजिका मनीषा भोईर यांनी यावेळी सांगितले.

# प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेतून जिहे कठापूर योजनेसाठी साडे बावीस कोटी रुपये मंजूर ; प्रकल्पाचे काम लागणार मार्गी : ना. महेश शिंदे

**कोरेगाव :** सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भागासाठी वरदान ठरलेल्या गुरुवर्य कै. लक्ष्मणराव इनामदार जिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी १८०० कोटी रुपयांची सुधारित तिसरी प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाला तत्वत: मान्यता मिळाली आहे. त्याचे पहिले टोकन म्हणून केंद्र सरकारने २२ कोटी ५१ लाख ३० हजार रुपये मंजूर केले आहेत. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेतून हा निधी मंजूर झाला असून, तो राज्य सरकारकडे वर्ग करण्यात आला आहे. या निधीतून योजनेची कामे पूर्ण केली जाणार असून, जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली आणले जाईल, दुष्काळी भागाचे नंदनवन होणार आहे, अशी माहिती कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना. महेश शिंदे यांनी दिली.

२०१४-१५ साली जिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनेचे नामकरण गुरुवर्य कै. लक्ष्मणराव इनामदार जिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजना असे करण्याबाबत सरकारकडे प्रस्ताव सादर केला होता, त्यास मान्यता दिल्यानंतर सरकारने निधीची तरतूद केली होती. २०१९ सालापर्यंत या योजनेचे सुमारे ९३ टक्के काम करण्यात यशस्वी झालो, त्याद्वारे दुष्काळी भागाला



हक्काचे पाणी उपलब्ध झाले. या योजनेचे विस्तारीकरण करण्याचा आणि त्याद्वारे वंचित गावांना पाणी देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत या योजनेचा समावेश होण्यासाठी प्रयत्न केले आहेत, त्याला यश आले असल्याचे त्यांनी सांगितले.

३१ जानेवारी २०२३ रोजी मुंबई येथे व्यापक आणि महत्वपूर्ण बैठक झाली, त्यामध्ये मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी कोरेगावसह सातारा आणि खटाव तालुक्यातील वंचित गावांना पाणी देण्यासाठी दोन टीएमसी पाणी देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी शासन निर्णयाद्वारे हा निर्णय कायम करण्यात आला. आपल्या माध्यमातून कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी गावांना दोन टीएमसी पाणी मिळाले खरे, पण ते फिरवण्याचे मोठे आव्हान होते. या योजनेचा विस्तार व्हावा, ती योजना प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत समाविष्ठ व्हावी, त्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळावी आणि त्याचबरोबर १८०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध व्हावा, यासाठी प्रयत्न केले असून, त्याला आता यश आले आहे.

कोरेगाव मतदारसंघातील दुष्काळी भाग हिरवागार करण्याचे स्वप्न पाहिले होते, ते आता आपल्या हातून पूर्ण होत आहे, याचा आनंद आहे. राज्य सरकारने कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी ते देखील थेट कॅबिनेट मंत्रिपदाच्या दर्जासह दिल्याने आता या कामाला गती मिळाली आहे. आपल्या कारकिर्दीत ही कामे मार्गी लागत असून, आता रामोशीवाडीपासून भाडळेपर्यंत सर्व गावे ही बारामाही सिंचनाखाली येणार आहेत. भाडळे तलावातून नलवडेवाडीच्या बंधाऱ्यात पाणी आणले जाणार असून, तेथून बिचुकले आणि तळियेच्या बंधाऱ्यातून हे पाणी कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागात नलवडेवाडी, पळशी, बिचुकले, देऊर, तळिये, पिंपोडे खुर्द, खामकरवाडी या गावांना दिले जाणार असून, ही गावे ओलिताखाली येणार आहेत, असेही ना. शिंदे यांनी सांगितले.

गुरुवर्य कै. लक्ष्मणराव इनामदार जिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनेसाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद व्हावी, सुधारित प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांच्यासह खासदार उदयनराजे भोसले यांनी त्यासाठी पाठपुरावा केला होता. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत गुरुवर्य कै. लक्ष्मणराव इनामदार जिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनेचा समावेश केल्याने निधीची उपलब्धता झाली असून, पहिला टप्पा म्हणून २२ कोटी ५१ लाख ३० हजार रुपये मंजूर झाले असल्याचे ना. महेश शिंदे यांनी निदर्शनास आणून दिले.

केंद्रात आणि राज्यात भाजपप्रणित एनडीए सरकारने विराजमान झाल्यानंतर खऱ्या अर्थाने या योजनेसाठी प्रशासकीय मान्यता, सुधारित प्रशासकीय मान्यता आणि निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. आपल्या गुरुंच्या नावावर योजना असल्याने पंतप्रधान ना. नरेंद्र मोदी यांनी तातडीने या योजनेसाठी मुक्त हस्ताने निधी दिला आहे. ही योजना पूर्ण होऊन दुष्काळी भागाचे नंदनवन झाले पाहिजे, यासाठी त्यांचा प्रयत्न होता, तो आता पूर्णत्वास जात आहे. एकूणच आम्ही विरोधकांसारखे केवळ शेती पाण्याच्या बाता मारत नाही, वल्गना करत नाही तर प्रत्यक्षात काम करुन दाखवतो. ज्यांनी जलसंपदा मंत्री असताना या योजनेसाठी तसभर परिश्रम घेतले नाहीत, दिल्लीत गेले नाहीत, त्यांनी केवळ राजकारणासाठी या योजनेचा वापर केला आहे, त्यांना आता समजून येईल की, आम्ही सर्वसामान्य शेतकरी हा केंद्रबिंदू मानून काम करत आहे, असेही ना. शिंदे यांनी स्पष्ट केले.

कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागाचे नंदनवन होणार असून, नलवडेवाडी, बिचुकले, तळिये, देऊर, पिंपोडे खुर्द आणि खामकरवाडी परिसरात आता कृष्णामाई खळखळणार आहे. त्याचबरोबर वर्धनगडाच्या पायथ्याशी असलेल्या रामोशीवाडीपासून भाडळेपर्यंत सर्वच गावांना पाणी दिले जाणार आहे, त्याचबरोबर रामोशीवाडी, भाटमवाडी, शेल्टी, खिरखंडी, एकंबे, वाघजाईवाडी ते जायगाव असे पाटाद्वारे पाणी दिले जाणार आहे. एकूणच दुष्काळी भागाला आता हक्काचे पाणी मिळणार आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# शालेय साहित्याचे वाटप म्हणजे विद्यार्थी घडवण्याची पायरी : राजुभैया भोसले

**सातारा :** गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करणे म्हणजे विद्यार्थी घडवण्याची ती पहिली पायरी असून राजमाता अहिल्यादेवी प्रतिष्ठानने हाती घेतलेले हे कार्य अत्यंत स्तुत्य आहे, असे प्रतिपादन सातारा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजुभैया भोसले यांनी केले.

राजमाता अहिल्यादेवी होळकर महोत्सव पठार विभाग सातारा यांच्यावतीने परळी खोरे आणि पठार विभागातील १२१३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला आ. श्रीमंत शिवेंद्रसिंहराजे भोसले, ऑल इंडियाचे माजी प्रदेशाध्यक्ष सुभाषराव येळे, सातारा जिल्हा



मध्यवर्ती बँकेचे संचालक सुरेश सावंत, धनगर समाज नेते बाळासाहेब खरात, उद्योजक बाळकृष्ण गावडे, उद्योजक काशिनाथ केंडे, बळवंत पाटील, धनगर समाज नेते राजू गोरे, सातारा बाजार समितीचे संचालक भिकुभाऊ भोसले, बाजार समितीचे माजी संचालक श्रीरंग देवरुखे यांच्यासह विविध गावचे सरपंच व पदाधिकारी, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

**आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडून हटके शुभेच्छा**

**राजमाता अहिल्यादेवी होळकर महोत्सव पठार विभाग साताराच्या प्रत्येक कार्यक्रमाला मी उपस्थिती त असतो. आजही उपस्थित राहिलो असे सांगत अहिल्यादेवी होळकर महोत्सव पठार विभाग राबवत असलेला प्रत्येक कार्यक्रम हा अनन्य साधारण आहे. सामाजिक बांधिलकी कशी जपावी हे यातून दिसते. शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप हा एक अत्यंत चांगला उपक्रम असल्याच्या शब्दात आ. श्रीमंत शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी शुभेच्छा दिलेल्या आहेत.**

राजुभैय्या भोसले पुढे म्हणाले, पठार भागामध्ये शिक्षण व्यवस्था अत्यंत विस्कळीत झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विद्यार्थी आहेत मात्र शाळा नाही अशा परिस्थितीतून पालकांना जावे लागत होते. परळी खोरे, ठोसेघर पठार विभागातही असेच चित्र अनेक वर्षांपूर्वी पाहायला मिळत असे. मात्र त्याकाळी स्वर्गीय भाऊसाहेब महाराज तथा अभयसिंहराजे भोसले यांनी शिक्षणाची गरज लक्षात घेऊन परळीसह पठार भागात गावागावात जिल्हा परिषदेच्या शाळा उभ्या राहतील यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नातून पठार भाग शैक्षणिक सुजलाम, सुफलाम झाला. त्यांच्या पश्चात आ. श्री. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पठार भागातील अनेक गावातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. परिणामी पठार भागातील अनेक विद्यार्थी उच्चशिक्षित झाले असून शिक्षणामुळे आज ते पुणे मुंबई सारख्या शहरांमध्ये उच्च पदावर काम करीत आहेत.

ते पुढे म्हणाले, पठार भाग हा मागासलेला आहे. बहुतांश शेतीवर उपजीविका करणारा वर्ग या परिसरात राहतो. त्यामुळे आपल्या मुलांनी उच्चशिक्षित व्हावे अशी दीर्घ इच्छा असताना सुद्धा पैसे अभावी मुलांना शिक्षण देता येत नाही, अशी परिस्थिती या भागात पाहायला मिळते. केवळ शालेय साहित्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहत आहेत ही बाब राजमाता अहिल्यादेवी होळकर महोत्सव पठार विभाग सातारा यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी पुढाकार घेऊन परळी खोरे व पठार भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेट देण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला. या उपक्रमामुळे खऱ्या अर्थाने गरीब मुलांना शिकण्याची कवाडे खुली झाली आहेत. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याची एक ताकद या माध्यमातून मिळण्यास मदत होणार असल्याचे राजुभैया भोसले यांनी स्पष्ट केले. अशा प्रकारचे नानाविध उपक्रम राबवून पठार विभागाला आपण सर्वजण पुढे घेऊन जाऊयात असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. राजमाता अहिल्यादेवी होळकर महोत्सव पठार विभाग साताराचे प्रमुख संजय शेडगे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये समिती राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. दोन दिवसाच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप मोहिमेत एकूण १२१३ विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. शालेय साहित्याचे वाटप करताना राजुभैया भोसले शेजारी सुभाषराव येळे, सुरेश सावंत, बाळासाहेब खरात, बलवंत पाटील, बाळकृष्ण गावडे, श्रीरंग देवरुखे, संजय शेडगे आदी मान्यवर.



# धोम धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे वाईच्या गणपती घाटावर पाणी

**सातारा :** क्षेत्र महाबळेश्वर वाई तालुक्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर कायम असल्यामुळे दुपारी धोम (ता वाई) धरणातून ३६२२ क्युसेक्स पाणी सोडण्यात आले. त्यामुळे कृष्णा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. वाईतील प्रसिद्ध महागणपती मंदिर घाटावर पाणी आले आहे. लगतच्या अनेक मंदिरामध्येही नदीचे पाणी शिरले असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. धोम धरण ८४ टक्के भरले आहे.

वाईच्या पश्चिम भागातील कृष्णा नदीवरील पहिले धरण बलकवडी(ता वाई) ८५ टक्के भरले आहे. बलकवडी धरणातून कृष्णा नदी द्वारे १२९८ क्युसेक्स पाणी धोम धरणात सोडण्यात येत आहे. दोन्ही धरणांमध्ये पाण्याची आवक चांगली असल्याने हा निर्णय घेण्यात आला.धरणातून वाईतील प्रसिद्ध महागणपती घाटावर पाणी आले आहे.धोम धरणातून आसरे बोगद्यातून २००क्युसेक्स पाणी भोर,खंडाळा, फलटण साठी सोडण्यात आले आहे.प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात दिला आहे.

## कागलमध्ये ६ ऑगस्टला फेरफार अदालत

**कोल्हापूर :** प्रशासनामार्फत कागल तालुक्यामध्ये दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी सर्व मंडळ मुख्यालयी फेरफार अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. फेरफार अदालतीमध्ये ज्या अर्जदार, खातेदारांनी खरेदी विक्रीनोंद, वारसनोंद, मृत्युपत्र नोंद, बोजा नोंद इ. बाबत संबधित तलाठ्यांकडे फेरफार नोंदीसाठी अर्ज दाखल केले आहेत परंतु अद्याप त्यावरील कार्यवाही प्रलंबित असेल अशा सर्व अर्जांचा निपटारा यामध्ये करण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांनी दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यंत आपण केलेल्या अर्जाच्या मूळ प्रतीसह व आवश्यक मूळ कागदपत्रांसह आपल्या संबंधित मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहुन या विशेष लोकाभिमुख उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कागलचे तहसिलदार अमरदिप वाकडे यांनी केले आहे.

# टोल नाक्याच्या विरोधात काँग्रेसचे ३ ऑगस्ट रोजी आंदोलन

**सातारा :** काँग्रेसने पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या आंदोलनाची घोषणा केली आहे. टोल माफ व्हावा, टोलमध्ये सवलत मिळावी यासाठी मोठं आंदोलन उभं केलं जाणार आहे. पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थेसंदर्भात काँग्रेसने येत्या शनिवारी ३ ऑगस्ट रोजी आंदोलनाची हाक दिली आहे.

महत्त्वाचं म्हणजे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह काँग्रेसचे पश्चिम महाराष्ट्रातील सर्व बडे नेते एका एका टोल नाक्यावर उभं राहून, आंदोलन करणार आहेत. आपआपल्या कार्यकर्त्यांसह काँग्रेसचे नेते आंदोलनात उतरतील. काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील यांनी याबाबतची घोषणा केली. याची माहिती काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ सुरेश जाधव यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.




**कोणत्या नेत्याकडे कोणत्या टोलची जबाबदारी?**

**कोल्हापूरच्या किणी टोल नाका येथे आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर जिल्ह्यातील कार्यकर्ते थांबून आंदोलन करणार आहेत. सातारा जिल्ह्यातील तासवडे टोल नाका येथे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि विश्वजीत कदम यांच्या नेतृत्वाखाली सांगली आणि कराडमधील काँग्रेस कार्यकर्ते सहभागी होतील. सातारा जवळच्या आनेवाडी टोल नाक्यावरती जिल्हा काँग्रेस चे अध्यक्ष डॉ सुरेशराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्यातील सातारा, कोरेगाव, खटाव, वाई, खंडाळा या तालुक्यातील काँग्रेसचे सर्व कार्यकर्ते सहभागी होतील. पुण्यातील खेड शिवापूर या टोलनाक्यावर काँग्रेस नेते संग्राम थोपटे यांच्यासह पुणे ग्रामीण जिल्ह्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होतील.**

पत्रकात नमूद आहे की काँग्रेसकडून टोल नाका परिसरात चक्काजाम करण्याचं नियोजन आहे. चक्काजाम आंदोलन करून वाहने विना टोल सोडली जाणार आहेत.

शनिवारी सकाळी दहा वाजता पुणे बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांसंदर्भात कोल्हापूरसह पेठनाका, कराड , सातारा, खेड शिवापूर येथील टोलनाक्यावर आंदोलन केलं जाणार आहे.

रस्त्यावरती प्रचंड मोठ्या प्रमाणावर खड्डे असल्याने आणि दुरावस्था झाल्याने काँग्रेसने या आंदोलनाची हाक दिली आहे. त्यासाठी काँग्रेस नेते सतेज पाटील, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आमदार विश्वजीत कदम, काँग्रेस नेते संग्राम थोपटे यांच्यासह पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते सहभागी होणार आहेत.

# जिल्ह्यात १४ ऑगस्टपर्यंत बंदी आदेश लागू

**कोल्हापूर :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात यात्रा, ऊरुस, सण इ. साजरे होणार असून विविध पक्ष, संघटनांकडून विविध मागण्यांसाठी आंदोलन, उपोषण, मोर्चा, इत्यादी प्रकारचे आंदोलन करण्यात येते. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यात दिनांक ३१ जुलै रोजी सकाळी ६ ते दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत बंदी आदेश जारी करण्यात येत असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी संजय तेली यांनी कळविले आहे.

हा आदेश ज्या सरकारी अधिकारी, कर्मचारी यांना त्यांची कर्तव्य, अधिकार बजाविणे संदर्भात कामकाज करताना उपर्निर्दिष्ट वस्तू हाताळाव्या लागतात आणि एकत्र जमावे लागते व ज्या व्यक्तींनी पोलीस अधीक्षक, कोल्हापूर अगर संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी अगर संबंधित विभागाचे पोलीस निरीक्षक किंवा सक्षम प्राधिकारी यांची परवानगी घेतलेली आहे, अशा व्यक्तींना तसेच सर्व जातीधर्माचे सण/उत्सव/जयंती/यात्रा इ. हे शांततामय मार्गाने साजरे करण्याकरीता जमा होणारा जनसमुदाय यांना व लग्न, इतर धार्मिक समारंभ, सण, यात्रा, प्रेतयात्रा इत्यादी यांना लागू असणार नाही. तसेच जिल्ह्यात सध्या महापुरामुळे सुरु असलेले मदत व पुनर्वसन कामी नेमलेले अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक यांना लागू असणार नाही.

# नामदार हसनसाहेब मुश्रीफ फाउंडेशनची पूरग्रस्तांना ब्लँकेटचे वाटप

**कोल्हापूर :** नामदार हसन मुश्रीफ फाउंडेशनने पूरग्रस्तांना मायेची ऊब दिली आहे. वेदगंगा नदीला आलेल्या महापुरामध्ये स्थलांतरित झालेल्या नानीबाई चिखली, बानगे, कुरुकली येथील पूरग्रस्तांना नामदार हसनसाहेब मुश्रीफ यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

वेदगंगेच्या या महापुरामुळे नानीबाई चिखली, बानगे, कुरुकली या तिन्ही गावातील महापूरग्रस्तांना निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्यात आले होते. या सर्वांचे संसार पाण्याखाली बुडून भिजून गेले होते. यावेळी नानीबाई चिखली येथील-१५०, कुरुकली येथील-७१, व बानगे येथील-६६, अशा एकूण २८७ महापूरग्रस्तांना ब्लँकेट्सचे वाटप झाले.

यावेळी कागलचे माजी नगराध्यक्ष प्रकाशराव गाडेकर, नानीबाई चिखलीचे बिद्री कारखान्याचे माजी संचालक प्रवीणसिंह भोसले, कागल तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्य सदाशिव तुकान, बानगेचे राजू पाटील, धनाजी पाटील, संतराम पाटील, कुरुकलीचे महेश पाटील, प्रकाश दाभोळे, माजी उपनगराध्यक्ष प्रविण काळबर, अर्जुन नाईक आदी प्रमुख उपस्थित होते.



# महाबळेश्वर रस्त्यावर खड्ड्यांचं साम्राज्य

## खड्ड्यांमुळे पर्यटकांना मनस्ताप

**महाबळेश्वर :** महाराष्ट्राचे नंदनवन म्हणुन प्रसिध्द असलेल्या महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणी चौका चौकात मोठ मोठे खड्डे पडले आहेत दोन महीन्यां पूर्वीच केलेले डांबरी रस्त्यांचे रूपांतर खड्डयात झाल्याने महाबळेश्वर शहरात येणारे पर्यटकांचे स्वागत खड्डयांनी केले जात आहे पालिकेच्या या गलथान कारभारा बाबत पर्यटक व नागरीकातुन संताप व्यक्त केला जात आहे.

उन्हाळी हंगामा पूर्वी शहरातील सवर्च रस्त्यांचे पालिकेच्या वतीने डांबरीकरण करण्यात आले होते पालिकेने शहरातील सर्व रस्ते चकाचक केल्याने मिडीयातुन पालिकेच्या कामाचे कौतुक करण्यात आले होते परंतु हे कौतुकाचे बोल पावसाच्या पाण्या बरोबर वाहुन गेल्याचे दिसत आहे कारण पावसाने पालिकेच्या कामाची पोलखोलच केली आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही पालिकेने केलेले काम निकृष्ठ दर्जाचे होते या वर पावसाने शिक्का मोर्तब केले असे. स्व. बाळासाहेब ठाकरे चौक छ. शिवाजी महाराज चौकात व शहरातील अनेक ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले आहेत

पालिकेने दोन महीन्यां पूर्वी ज्या ज्या रस्त्यांवर डांबरीकरण केले होते त्यातील बहुतांशी रस्त्यांवरील डांबर पावसात वाहुन गेले आहे. नंदनवनात येणारे पर्यटक हे एमतर स्व बाळासाहेब ठाकरे चौकतुन शहरात दाखल होतात किंवा छ. शिवाजी महाराज चौकातून. या दोन्ही प्रमुख चौकात मोठ मोठे खड्डे पडले आहेत त्या मुळे पर्यटकांच्या स्वागतासाठी पालिकेनेच हा अभिनव उपक्रम राबविला आहे अशा शब्दात शहरातील नागरीक पालिकेच्या गलथान कारभाराची खिल्ली उडवित आहे.

# कराड अर्बन बझारची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**कराड :** रविवार दिनांक २८ जुलै २०२४ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता अर्बन बझारची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पंकज मल्टीपर्पज हॉल, शनिवार पेठ, कराड येथे संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी सौ. सायली समीर जोशी होत्या. प्रास्ताविकपर मनोगतमध्ये त्यांनी सभासद, ग्राहक व हितचिंतक यांच्याकडून मिळालेल्या सहकार्यानेच संस्थेची प्रगती होत असल्याचे म्हणाले.

सभासदांना खरेदीवर १० टक्के ते १५ टक्केची सवलत देण्याचा निर्णय जाहिर केला.

सभेपुढील सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. सभेस अर्बन कुटुंब प्रमुख श्री. सुभाषराव जोशी, अर्बन बँकेचे अध्यक्ष श्री. डॉ. सुभाष एरम, बँकेचे उपाध्यक्ष श्री. समीर जोशी, अर्बन बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. सीए दिलीप गुरव, बझारचे मा. संचालक मंडळ व सभासद उपस्थित होते.

जनरल मॅनेजर युनूस सुतार यांनी सभेच्या नोटीसीचे वाचन केले. अर्बन बझारच्या उपाध्यक्षा सौ. जयश्री गुरव यांनी आभार मानले.

# महसुल सप्ताहात विविध दाखले प्राप्त करुन घेण्याचे आवाहन

**कोल्हापूर, :** जिल्ह्यात महसुल व वन विभागाव्दारे दिनांक १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२४ या दरम्यान महसुल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत दिनांक ५ ऑगस्ट २०२४ रोजी सैनिक हो तुमच्यासाठी हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सेवानिवृत्त अधिकारी, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीर पत्नी, वीरमाता व त्यांचे अवलंबीत माजी सैनिकांनी त्यांच्या महसुल संबधिच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी संबंधित तालुक्यातील तहसिलदार कार्यालयात निवेदन देवून आवश्यक असणारे महसुल कार्यालयाकडुन निर्गमित होणारे विविध दाखले प्राप्त करुन घ्यावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल (निवृत्त) डॉ. भिमसेन चवदार यांनी केले आहे.

# शासन आपल्या दारी अभियानाचा हजारो नागरिकांनी घेतला लाभ

## आमदार जयकुमार गोरेंच्या प्रयत्नातुन झालेल्या या अभियानाचं जनतेमधून समाधान व्यक्त!

**वडूज :** राज्य सरकारचा अभिनव उपक्रम असलेल्या 'शासन आपल्या दारी' या योजनेअंतर्गत , माण-खटाव विधानसभा मतदारसंघाचे जयकुमार गोरे यांच्या संकल्पनेतून तहसील कार्यालय वडूज ता.खटाव या ठिकाणी अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं.

यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा हजारो लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

खटाव तालुका महसूल प्रशासनाच्या वतीने नागरिकांना शासनाच्या विविध योजना उपलब्ध करून देण्यासाठी तालुक्यातील ११ ठिकाणी मंडल निहाय सोमवार दिनांक १५ ते ३० जुलै या कालावधीत शासन आपल्या दारी अभियान राबविण्यात येत असून वडूज येथील अभियानास सर्कल मधील



विविध गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या अभियानात सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत केंद्र व राज्य सरकारच्या सेवा-योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली.त्याच बरोबर विविध प्रकारचे आवश्यक दाखले देण्यात आले.

या अभियानामध्ये गरजुंना संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना, शिधापत्रिका, आधार कार्ड, लाडकी बहीण योजना, जातीचे दाखले, नॉन क्रिमिलेअर, उत्पन्न दाखले, डोमीसाइल, शेतकरी, अल्पभूधारक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, रहिवासी दाखला, डोंगरी दाखला, सातबारा दुरुस्ती व वारस नोंदी आदी सुमारे १६०० हुन अधिक दाखले देण्यात आले. प्रांत अधिकारी उज्वला गाडेकर तहसीलदार बाई माने यांच्या मार्गदर्शना खाली लाभार्थी नागरिकांना हे दाखले देण्यात आले.

दरम्यान वडूज येथील तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या या अभियान उदघाटन प्रसंगी आमदार जयकुमार गोरे यांनी महायुतीचे सरकार सत्तेत आल्यानंतर मोठ्या प्रमाणात जनहिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. शासनाच्या योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन आपल्या दारी अभियान आयोजन करण्यात येत असल्याचं सांगून शासकीय कर्मचाऱ्यांनी गरजू लाभार्थ्यांना कागद पत्रा अभावी दाखले अडकवून त्रास न देता गरजू लोकांची काळजीनं कामं करावीत अशा सूचना केल्या. आणि यापुढेही जनतेच्या विकास कामी उभा राहणार असल्याचं ठाम पणे सांगितलं.

यावेळी प्रांत सो. उज्वला गाडेकर, तहसीलदार बाई माने, जिल्हा नियोजन चे प्राध्यापक बंडा गोडसे,वडूज नगरपंचायत मुख्याधिकारी कपिल जगताप,भाजप तालुका अध्यक्ष धनंजय चव्हाण माजी पंचायत समिती सदस्य नंदकुमार गोडसे,भाजप पदाधिकारी विकल्प शहा, विक्रम रोमण आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# मायणी येथील महाविद्यालयास नॅककडून ब दर्जा मानांकन प्राप्त

**मायणी :** मायणी येथील कला व वाणिज्य महाविद्यालयास नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रेडिटेशन कौन्सिल (नॅक) बेंगलोर या संस्थेकडून बी दर्जाचे (CGPI २.४) मानांकन प्राप्त झाले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शौकतअली सय्यद यांनी दिली. बौद्ध गया विद्यापीठ, बिहारचे प्रो. डॉ. विनय कुमार यांच्या अध्यक्षतेखाली, आंध्र प्रदेशातील कुर्नूल विद्यापीठाचे कुलसचिव प्रो. डॉ. श्रीनिवासुलू बायनेनी आणि आसाम मधील कॉलेजचे प्राचार्य डॉ. भाबेन चंद्र नियोग यांच्या त्रिसदस्यीय समितीने १५ व १६ जुलै रोजी महाविद्यालयास भेट देऊन सखोल तपासणी केली. राष्ट्रीय स्तरावरील हे मानांकन प्राप्त करण्यासाठी महाविद्यालयातील सर्वच घटकांना कठीण कसोटींना सामोरे जावे लागते. अभ्यासक्रमाचे पैलू, अध्यापन-अध्ययन-मूल्यांकन, संशोधन-नवोपक्रम व विस्तार कार्य, पायाभूत सुविधा व शैक्षणिक संसाधने, विद्यार्थी सहभाग व प्रगती, प्रशासन-नेतृत्व व व्यवस्थापन, संस्थात्मक विकास व उत्कृष्ट उपक्रम अशा सात मूल्यमापन कसोट्यांचा वापर करून हे मूल्यांकन केले जाते.

# राज्यात ८१ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूक प्रकल्पांना मंजुरी

## २० हजार तरुणांना रोजगार मिळण्याची शक्यता!

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाच्या उपसमितीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील गुंतवणुकीबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्रिमंडळाच्या उपसमितीने राज्यात ८१ हजार १३७ कोटी रूपयांच्या गुंतवणूक प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांद्वारे राज्यातील २० हजार तरुणांना रोजगार मिळल्याची शक्यत आहे. राज्य सरकारने परिपत्रक जारी करत यासंदर्भात माहिती दिली.

राज्य सरकारने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गुंतवणुकदारांचा ओघ वाढत आहे. त्यानुसार ८१ हजार १३७ कोटी रूपये गुंतवणुकीच्या प्रकल्पांना आज उद्योग विभागाच्या मंत्रीमंडळ उपसमितीत मंजुरी देण्यात आली. यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम बॅटरी, इलेक्ट्रील व्हेईकल, सेमीकंडक्टर चिप, फळांचा पल्प निर्मिती या प्रकल्पांचा समावेश आहे. याप्रकल्पांद्वारे कोकणसह मराठवाडा, विदर्भ या भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे राज्यात सुमारे २० हजार तरुणांना



प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार असल्याचे राज्य सरकारने म्हटलं आहे.

### कोणत्या प्रकल्पांना मिळाली मंजूरी?

१) जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी इलेव्हन लि. यांची लिथियम बॅटरी निर्मितीच्या प्रकल्पासाठी गुंतवणूक. हा प्रकल्प नागपूर भागात होणार आहे. प्रकल्पामध्ये एकूण २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. याद्वारे ५ हजार पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे.

२) जेएसडब्ल्यू ग्रीन मोबिलीटी लि. कंपनी, इलेक्ट्रीक आणि हायब्रीड वाहन निर्मिती प्रकल्प : हा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण २७ हजार २०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. याद्वारे ५ हजार २०० पेक्षा अधिक रोजगार निर्मिती होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामध्ये वार्षिक ५ लाख इलेक्ट्रीक प्रवासी कार व १ लाख व्यावसायिक कार निर्मितीचे नियोजन आहे.

३) हिंदूस्थान कोका-कोला बेव्हरेज मार्फत फळाचा पल्प आणि रस यावर आधारित उत्पादन निर्मिती प्रकल्प : हा प्रकल्प रत्नागिरी येथे होणार आहे. यात १५०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

४) आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीमार्फत सेमीकंडक्टर चिप्स निर्मितीचा एकात्मिक प्रकल्प : हा प्रकल्प रायगड जिल्ह्यातील तळोजा/पनवेल, रायगड/पुणे/उर्वरीत महाराष्ट्रामध्ये उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्रातला हा पहिलाच सेमीकंडक्टर निर्मिती करणारा प्रकल्प आहे. याप्रकल्पामध्ये प्रथम टप्यात १२ हजार कोटी रूपयांची गुंतवणूक होणार. याद्वारे ४ हजार पेक्षा अधिक रोजगार निर्मिती होण्याची शक्यता आहे. दुसऱ्या टप्यामध्येही १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. महापे, नवी मुंबई येथे प्रकल्पाचे काम सुरू झाले असून, प्रायोगिक तत्वावर सप्टेंबर २०२४ पर्यंत सुरू होणार आहे.

५) आवाडा इलेक्ट्रो कंपनीचा सोलर पीव्ही मॉड्युल्स आणि इलेक्ट्रोलायझरचा एकात्मिक प्रकल्प : हा प्रकल्प नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी अतिरिक्त एमआयडीसी, पनवेलमधील भोकरपाडा एमआयडीसी या परिसरात उभारण्यात येणार आहे. कंपनीमार्फत नवीकरणीय ऊर्जा स्रोताचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित राज्यात प्रकल्प स्थापित होणार आहे. प्रकल्पामध्ये एकूण १३ हजार ६४७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, याद्वारे ८ हजार पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे.

६) परनॉर्ड रिकार्ड इंडिया प्रा.लिमिटेड मार्फत मद्यार्क निर्मितीचा प्रकल्प : हा प्रकल्प नागपूरमधील अतिरिक्त बुटीबोरी एमआयडीसी येथे स्थापन करण्याचे नियोजित आहे. प्रकल्पामध्ये १७८५ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

## कोकणात पासून मासेमारी सुरु



**अलिबाग :** कोकणात मासेमारी हंगामाला १ ऑगस्ट पासून सुरुवात होणार आहे. पण किनारपट्टीवरील भागात वादळी वारे आणि पावसाचा जोर अद्याप कमी झालेला नाही. त्यामुळे १ ऑगस्टचा मासेमारीचा मुहूर्त टळण्याची शक्यता आहे.

गेली दोन महिने कोकण किनारपट्टीवर मासेमारी बंद होती. त्यामुळे मच्छिमारांनी त्यांच्या बोटी किनारपट्टीला शाकारून ठेवल्या होत्या. मासेमारी बंदीचा कालावधी ३१ जुलैला संपुष्टात येणार आहे. त्यामुळे मासेमारीच्या नव्या हंगामाची मच्छीमार सुरुवात करणार आहेत. यासाठी लगबग सुरु झाली आहे. बोटीची डागडुजी आणि रंगरंगोटी आणि मच्छीमार जाळ्यांची देखभाल दुरुस्तीची कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. डीझेल, बर्फ अन्न धआन्य याची जमवाजमव सध्या सुरू आहे. किनाऱ्यावर जाळी विणणे, होड्यांना तेल लावणे, बोर्ड रंगवणे या सारखी कामे सुरू आहेत.

'परंतु किनारपट्टीवरील भागात सोसाट्याचे वारे वाहत आहेत. पावसाचा जोरही कायम आहे. त्यामुळे मच्छीमार बोटी समुद्रात उतरवाव्यात अथवा नाही याबाबत साशंक आहेत. त्यामुळे अनेक मच्छीमारांनी अद्याप आपल्या बोटी पाण्यात उतरवेल्या नाहीत. त्यामुळे १ ऑगस्टचा मुहूर्त टळण्याची शक्यता आहे.

दरवर्षी समुद्रात भरपुर मच्छी मिळू दे आणि नुकसान टळू दे अशी मनोभावे प्रार्थना करून, तसेच मुहूर्त काढून, पुजा अर्चा करून मासेमारी होड्या समुद्रात सोडल्या जातात. काही जण नारळी पोर्णिमेनंतर आपल्या बोटी पाण्यात उतरवत असतात. त्यामुळे यंदा मोजक्या बोटीच १ तारखेला मासेमारीला जातील अशी शक्यता आहे.

# मराठा आरक्षणाच्या शिंदे समितीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**मुंबई :** राज्यातील मराठा आरक्षणाचा प्रश्न गंभीर बनला असतानाच आता पुन्हा एकदा राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात गठीत केलेल्या शिंदे समितीला मुदतवाढ दिली आहे. विशेष म्हणजे आता या समितीला थेट ३१ डिसेंबरपर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे, आता मराठा आरक्षणाच्या विषयी या समितीकडून थेट विधानसभा (तळवहरपीरलहर) निवडणुकांच्या नंतरच अहवाल सादर केला जाणार असल्याचे स्पष्ट झालं आहे. यापूर्वीही अनेकदा या समितीला सरकारकडून मुदतवाढ देण्यात आली होती. आता, थेट ५ महिन्यांची मुदतवाढ दिल्यामुळे, मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे (चरपेक्ष गरीरपसश) पाटील काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित करुन आता विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. १३ ऑगस्ट रोजी ते आपली भूमिका जाहीर करणार आहेत. मात्र, तत्पूर्वी सरकारकडून त्यांना आरक्षण व सगेसोयरे अध्यादेशाच्या अंमलबजावणीबाबत अपेक्षा होती. मात्र, या दोन्ही मुद्द्यांवर काम करणाऱ्या समितीला आणखी मुदतवाढ देण्यात आली आहे. मराठा कुणबी नोंदी शोधण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्या. शिंदे समितीला राज्य सरकारने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत होती. या मागणीला अनुसरून राज्य सरकारने निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या नेतृत्त्वात एक समिती स्थापन केली आहे, त्या समितीला अहवाद सादर करण्यासाठी सातत्याने मुदतवाढ देण्यात आली आहे. आता, चक्क ५ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली असून ३१ डिसेंबरपर्यंतची ही मुदतवाढ आहे.

मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर राज्य सरकारने राज्यातील कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी जातीचा शोध घेऊन प्रमाणपत्र देण्याची पद्धत निश्चित करण्यासाठी शिंदे समिती स्थापन केली होती. राज्यातील मराठा- कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदीसाठी आवश्यक पुराव्यांची तपासणी करणे आणि प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याचे काम शिंदे समितीकडून सुरू आहे.

या समितीकडून मराठा आरक्षणाबाबत कुणबी असल्याचे दाखले शोधण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी मराठवाड्यासह राज्यातील इतर भागांमध्ये समितीचे दौरे पार पडले आहेत. विविध ठिकाणचे दस्ताऐवज तपासून मराठा समाज हा कुणबी असल्याची नोंद तपासली जात आहे. दरम्यान, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात या समितीने तेलंगणासह इतर राज्यात जाऊन अभ्यास केला आहे.

समितीने ३१ ऑक्टोबर रोजी पहिला अहवाल दिला

यापूर्वी न्या. शिंदे समितीचा पहिला अहवाल ३१ ऑक्टोबर रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वीकारण्यात आला होता. शिंदे समितीला फारशी, उर्दू आणि अन्य भाषेतील दस्तऐवजांचे भाषांतर करण्यासाठी पुरेसा वेळ आहे. त्यासाठी सरकारने समितीला पुन्हा एकदा २९ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. डिसेंबर महिन्यात शिंदे समितीने आपला दुसरा अहवाल सरकारला सादर केला होता.

या अहवालामध्ये मराठा समाजाला जात प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक भूमि अभिलेख विभागातील कागदपत्रे सादर करण्यात आली आहे. या कागदपत्रांमध्ये मराठा समाजाला जात प्रमाणपत्र देण्यासाठीच्या आवश्यक नोंदी असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तसेच, १९६७ पूर्वीच्या या नोंदी असल्यामुळे जात वैधता पडताळणी समितीसमोर जात प्रमाणपत्र सादर केल्यावर अडचणी येणार नसल्याचं अहवालात म्हटले आहे. तसेच, शिंदे समितीकडून तब्बल मराठा कुणबी, कुणबी मराठा आशा ५४ लाख नोंदी मिळाल्याची अहवालात नोंद असल्याची देखील माहिती सूत्रांनी दिली आहे.

# बेकायदा टोल वसुली थांबवण्याची शिवसेनेची मागणी

**देऊळगाव राजे :** यवत ते इंदापूर उजनीपुलापर्यंत रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून त्यामुळे चार चाकी गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, खड्ड्यांमुळे गंभीर स्वरूपाच्या अपघात घडले असून रस्त्यावर पडलेले खड्डे न भरता टोल कंपनीने टोलनाक्यावरून बेकायदा टोल वसुली करत



आहे , सदर चालु असलेली टोल वसुली त्वरित थांबवा असे निवेदन टोल कंपनीला दिले आहे,नाही तर शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा पक्षाचे(उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख शरदचंद्र सूर्यवंशी यांनी दिला आहे. सर्विस रोडचे काम अपूर्ण असताना स्थानिक नागरिकांकडून केलेली टोल वसुली पूर्णता बेकायदेशीर आहे, टोल नाक्यावर गुंडांची अरेरावी टोल प्रशासनाने नेमलेल्या नेमलेल्या एजन्सीकडून सर्वसामान्य नागरिकांवर केली जात आहे, सदर निवेदनाच्या प्रती प्रांताधिकारी, तहसीलदार, उपविभागीय पोलिस अधिकारी दौंड यांना देण्यातआल्या आहेत. यावेळी जिल्हाप्रमुख शरदचंद्र सूर्यवंशी ,जिल्हा उपप्रमुख अनिल सोनवणे ,शंकर शितोळे, किरण वाळुंजकर, शिवाजी साळुंखे ,बापू गायकवाड, ज्योती गाडे , आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## प्रतिनीधी करण गिरमकर यांचे सी.ए.परीक्षेत घवघवीत यश

**देऊळगाव राजे :** इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया यांच्या द्वारे घेण्यात येणाऱ्या सनदी लेखापाल ( सी.ए ) परीक्षेत देऊळगाव राजे येथील करण प्रशांत गिरमकर यांनी घवघवीत यश संपादन केले, कोणत्याही प्रकारचे क्लासेस न लावता,योग्य नियोजन,अभ्यासाचे वेळापत्रक बनवून,सातत्यपूर्ण अभ्यास करून करणने हे यश मिळवले आहे, करण याचे शिक्षण दहावीपर्यंत एंजल हायस्कूल हडपसर येथे झाले,अकरावी, बारावी पर्यंत शिक्षण एस.पी कॉलेज पुणे येथे झाले,त्यानंतर एम.पी. चितळे संस्थेत काम करीत असताना करण ने परीक्षेचा योग्य अभ्यास करत हे यश मिळवले,त्याचे वडील प्रशांत गिरमकर दौंड न्यायालयात वकील आहेत वडिलांच्या पन्नासाव्या वाढदिवसाच्या दिवशीच या परीक्षेचा निकाल लागल्यामुळे मुलाने वडिलांना एक अनोखी भेट देण्याचा योग जुळून आला,तर आई अपर्णा गिरमकर या दौंड पंचायत समितीच्या माजी सदस्या आहेत,अ

## पालिका पायाभुत सुविधासाठी मोठा निधी मिळनार : आ. कुल

**दौड :** दौंड नगरपालिकेचा समावेश केंद्र शासनच्या अमृत २.० योजनेमध्ये झाला असून या माध्यमातून पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी मोठा निधी उपलब्ध होणार असल्याची माहिती दौंड तालुक्याचे आमदार अॅड. राहुल कुल यांनी दिली आहे.

अटल मिशन फॉर रिजुवेनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत २.०) या योजनेसाठी महाराष्ट्राला सुमारे ३१ हजार ७२२ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यापैकी पहिला टप्पा ९ हजार ३१० कोटी वितरीत देखील करण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यातील फक्त दौंड नगरपालिकेचा समावेश अमृत २.० योजनमध्ये करण्यात आला आहे. या योजनेमुळे शहराचा पुढील २० वर्षाचा डीपी प्लॅन तयार होणार आहे. यामध्ये शहराच्या वाढत्या लोकसंख्येसाठी पुरेसे पाणी, जल वितरण व्यवस्था, पाण्याच्या टाक्या, पाईपलाईन, प्रत्येक घरात नळ कनेक्शन, पाण्याचा बॅलन्स टँक, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि झाडांसाठी सांडपाणी वापरण्याच्या योजना अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे.

## पाटण तालुक्यात अपघात विम्याचे २३ प्रस्ताव मंजूर

पाटण : गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकुण २३ प्रस्ताव मंजूर झाले असून प्रत्येकी दोन लाख रुपये प्रमाणे एकुण ४६ लाख रुपये अनुदानाचा लाभ सबंधित मृताच्या कुटुंबीयांना मिळाला असल्याची माहिती पाटणचे तहसिलदार तथा योजना समितीचे अध्यक्ष अनंत गुरव यांनी दिली,

यावेळी तालुका कृषी अधिकारी कुंडलिक माळवे उपस्थित होते.

पाटण तालुक्यात गत वर्षात व चालू आर्थिक वर्षात रस्ते अपघात , पाण्यात बुडून , विजेच्या धक्क्याने , जंगली प्राण्यांच्या हल्यात असा विविध घटनांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना, त्यांच्या कुटुंबाला शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत प्रत्येकी दोन लाख रुपये प्रमाणे एकूण २३ कुटुंबांना ४६ लाख रुपये अनुदान मंजूर झाले आहे ,

सन २०२३-२४ या मागिल वर्षात एकुण १६ प्रस्ताव आले होते त्यापैकी १२ प्रस्ताव मंजूर होऊन अनुदान वारसांच्या थेट खात्यावर जमा करण्यात आले आहेत तर त्रुटींमुळे प्रलंबित असलेल्या व नंतर कागदपत्रांची पूर्तता झालेले चार प्रस्तावांचे अनुदान या आठवड्यात जमा होईल , तसेच सन २०२४-२५ या चालू वर्षात ९ प्रस्ताव आले होते त्यापैकी ७ प्रस्तावांना तालुका स्तरीय समितीने मंजुरी दिली आहे, तर त्रुटींमुळे दोन प्रस्ताव नामंजूर आहेत, मंजूर प्रस्तावांच्या निधीसाठी शासनाकडे मागणी केली आहे. तालुक्यातील असे एकूण २३ अनुदान योजना अंतर्गत प्रस्ताव मंजूर झाले आहेत. यापैकी मंजूर प्रस्तावातील कुटूंबांना २४ लाख रुपये अनुदान अदा करण्यात आले तर सन २०२४/२५ या वर्षात मंजूर झालेल्या ७ कुटुंबांना एकूण १४ लाख रुपये अनुदान अदा करण्यात येत असल्याचे कुंडलिक माळवे यांनी सांगितले.



# विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची जोरदार तयारी

## कार्यकर्त्यांना नाना पटोलेंच्या खास सूचना

**मुंबई :** भारतीय जनता पक्ष धार्मिक तेढ निर्माण करून राजकीय पोळी भाजण्याचे राजकारण करत आहे. भाजपा देश तोडण्याचे काम करत असताना राहुल गांधी मात्र देश जोडण्याचे काम करत आहेत. लोकसभा निवडणुकीत जनता काँग्रेस व इंडिया आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली. विधानसभेची निवडणूक तीन महिन्यावर आली आहे, लोकसभेत चांगले यश मिळाले म्हणून गाफील राहू नका, विधानसभा निवडणुकीसाठीही मेहनत करा, जनतेपर्यंत जा व काँग्रेस व महाविकास आघाडीची सत्ता आणण्यासाठी काम करा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे.

काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवनमध्ये प्रदेश काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाची आढावा बैठक प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. वजाहत मिर्झा आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आढावा बैठकीला मार्गदर्शन करताना नाना पटोले म्हणाले की, काँग्रेस सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन काम करणारा पक्ष आहे.

लोकसभा निवडणुकीत देशभरातील विविध पक्षांनी एकत्र येऊन इंडिया आघाडी स्थापन केली व राज्यात महाविकास आघाडीने एकत्र निवडणूक लढवली. लोकसभा निवडणुकीत दलित, मागास, आदिवासी, अल्पसंख्याक समाज, महिला, तरुणांचा कौल इंडिया आघाडीला मिळाला व आता राज्यातही परिवर्तन व्हावे ही जनतेची भावना आहे, आपण जनतेपर्यंत जाऊन काँग्रेसचा विचार पोहचवला पाहिजे.



# केरळमध्ये मुसळधार पावसामुळे भूस्खलन

## १९ जणांचा मृत्यू, शेकडो लोक अडकले ढिगाऱ्याखाली

**तिरुअनंतपुरम :** गेल्या काही दिवसांपासून केरळमध्ये मुसळधार पाऊस होत आहे. या मुसळधार पावसामुळे वायनाडमध्ये भूस्खलन झाले. याच भूस्खलनामुळे आत्तापर्यंत १९ जणांचा मृत्यू झाला असून, १०० पेक्षा जास्त लोक ढिगाऱ्याखाली दबल्याची माहिती दिली जात आहे. या सर्व बाधितांना वाचवण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. दरम्यान, मृतांमध्ये तीन मुलांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

केरळ राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (केएसडीएमए) याबाबत माहिती दिली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, 'बाधित भागात अग्निशमन दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) पथके तैनात करण्यात आली आहेत. एनडीआरएफची अतिरिक्त टीम वायनाडला जाणार आहे. आरोग्य विभाग-राष्ट्रीय आरोग्य अभियानाने एक नियंत्रण कक्ष देखील सुरु केला आहे. या कक्षाशी संपर्क केल्यानंतर या भूस्खलनात बाधितांची माहिती मिळू शकते.

तसेच आपत्कालीन मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांकही जारी करण्यात आला असून, नागरिकांनी ९६५६९३८६८९ आणि ८०८६०१०८३३ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

केरळमध्ये झालेल्या या भूस्खलनानंतर हवाई दलाची एमआय-१७ आणि एक एएलएचची दोन हेलिकॉप्टर सकाळी साडेसात वाजता सुलूरहून निघाली आहेत. सध्या बचावकार्य सुरु असून, या भूस्खलनाच्या पार्श्वभूमीवर केरळमधील व्यथिरी, कालापट्टा, मेप्पडी आणि मानंतवाडी रुग्णालयांसह सर्व रुग्णालये सज्ज आहेत. सर्व आरोग्य कर्मचारी सेवेसाठी दाखल झाले.

केरळमधील वायनाड जिल्ह्यात मुसळधार पावसानंतर झालेल्या भीषण भूस्खलनाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मेपाडीजवळील अनेक डोंगराळ भागात झालेल्या या अपघातात अनेकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त होत आहे. ढिगाऱ्याखाली शेकडो लोक अडकले असण्याची शक्यता आहे.

वायनाडच्या काही भागात झालेल्या भूस्खलनावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दु:ख व्यक्त केले. या दुर्घटनेत ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत आणि यामध्ये जे कोणी जखमी आहेत त्यांच्यासाठी मी प्रार्थना करतो. सर्व बाधितांना मदत करण्यासाठी सध्या बचावकार्य सुरू आहे. केरळच्या मुख्यमंत्र्यांशीही याबाबत बोलणं झालं आहे. यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपये दिले जाणार आहेत. तर जखमींना ५० हजार रुपये देण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली.